महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता)**

क्र. पोमसं/८-अ/पदोन्नती का.अ./निवडसुची/२०२२- २३/१५५/२०२२ मुंबई, दि. १९/०१/२०२३

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमूद "कार्यालय अधीक्षक यांना प्रशासकीय अधिकारी (राजपत्रित गट-ब)" पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे.

| क्र | कार्यालय अधीक्षकाचे नाव | सध्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रमोद ज्ञानदेव तांबूळकर | पोलीस आयुक्त,<br>मिरा भाईंदर, वसई विरार | पोलीस आयुक्त,<br>पिंपरी चिंचवड |

२. उपरोक्त पदोन्नतीची पदस्थापना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी- २०१८/ प्र.क्र. ३६६/ १६- ब, दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

**रजनिश सेठ**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

<u>प्रति,</u>

पोलीस आयुक्त, मिरा भाईंदर, वसई विरार / पिंपरी चिंचवड

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएचवाय/ १०८२/ सीआर/ ११००(२)/ अेसईआर-३, दिनांक ६/११/१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.से. (वेतन) नियम, ११ (१) (अ) अन्वये कार्यवाही केली जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

२. उपरोक्त कार्यालय अधीक्षक यांच्याविरुध्द आता नव्याने प्राथमिक / विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा या निवडसुची वर्ष सन २०२२-२३ मध्ये संपुष्टात येत नसेल, तर त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त न करता सविस्तर अहवाल या कार्यालयात पाठवून, पुढील आदेशाची कृपया वाट पहावी.

३. संबंधित कार्यालय अधीक्षक यांचेविरुध्द काहीच प्रलंबित नसेल तर, त्यांना पदस्थापना केलेल्या कार्यालयात रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे. तसेच, ज्या कार्यालय अधीक्षक यांना पदोन्नती नाकारायची असेल, अशा कार्यालय अधीक्षक यांनी योग्य मार्फतीने ७ (सात) दिवसाच्या आत न चुकता या कार्यालयास सादर करण्याबाबत संबंधित कार्यालय अधीक्षक यांना सुचना द्याव्यात.

४. पदोन्नत झालेले कार्यालय अधीक्षक यांचे हार्दिक अभिनंदन.

<u>प्रत कार्यवाहीसाठी,</u>

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय

२. सदरचे आदेश पोलीस महासंचालक यांचे संकेतस्थळावर सर्वांसाठी एक महिन्याकरिता उपलब्ध करुन द्यावेत.

प्रत,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १०/ १२/ ३६

**( अनुप कुमार सिंह )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता